पुणे वैभव

RNI NO. MAHMAR/2002/06283

श्री. किरण जाधव मुख्य संपादक | श्री. सिकंदरसिंग दुधानी कार्यकारी संपादक

वर्ष : २४ | अंक : ३०८ | रविवार, दि. १६ फेब्रुवारी २०२५ (दैनिक) | किंमत ५ | पृष्ठ संख्या ४

Vol : 24 | Issue : 308 | Sun : 16 Feb 2025 (Daily) | Price 5 | Page 4

श्री. ॲड. प्रशांत साळुंके सहसंपादक | श्री. एम. जी. शेलार मुख्य उपसंपादक



# ग्रामसचिवालय, पिरंगुट येथे संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक व्याख्यानमाला संपन्न

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, बहि:शाल शिक्षण मंडळ व ज्येष्ठ नागरिक सहायता कक्ष, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, अनंतराव पवार महाविद्यालय आणि ग्रामपंचायत पिरंगुट यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामसचिवलाय,पिरंगुट येथे संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक व्याख्यानमालेचे आयोजन दि. ११ फेब्रुवारी ते १३ फेब्रुवारी २०२५ या दरम्यान सकाळी १०.३० वा. करण्यात आले होते. व्याख्यानमालेच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून बहि:शाल शिक्षण मंडळ व ज्येष्ठ नागरिक सहायता कक्षाचे संचालक डॉ. हरिश्चंद्र नवले हे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. जी. लोबो हे होते. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. एस. बी. शिंदे, प्रा. भरत कानगुडे, मंडल अधिकारी गायकवाड साहेब, मा. श्री. शंकरकाका पवळे, पोलीस पाटील मा. श्री. प्रकाश पवळे, मा. श्री. तुषार पवळे आदी मान्यवर उपस्थित होते.

व्याख्यानमालेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना मा. प्रा. डॉ. हरिश्चंद्र नवले यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बहि:शाल शिक्षण मंडळ व ज्येष्ठ नागरिक सहायता कक्ष स्थापनेचा उद्देश सांगताना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांबरोबरच ज्येष्ठ नागरिकांसाठी देखील आयोजित केल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती दिली. बहि:शाल शिक्षण म्हणजेच चार भिंती बाहेरील शिक्षण हे सांगताना बहि:शाल शिक्षण मंडळाची कार्यपद्धती देखील सांगितली. या तीन दिवसीय व्याख्यानमालेचे पहिले पुष्प : दि. ११ फेब्रुवारी २०२५ रोजी मा. श्री. अरुण रोडे यांनी 'पंढरीची वारी : एक चालते बोलते विद्यापीठ' या विषयावर गुंफले. आपल्या व्याख्यानातून त्यांनी आळंदी ते पंढरपूर वारीचा प्रवास मांडला. प्रथमतः त्यांनी वारी म्हणजे काय? वारीचा आनंद कसा असतो, वारीची परंपरा, ज्ञानेश्वर माउलींचा जन्मदिवस, त्याचे महत्त्व, माउलींचे बंधू, देहूची तुकोबांची दिंडी परंपरा, आळंदीची माउलींच्या दिंडीची परंपरा यावेळी त्यांनी सांगितली. माउलींच्या दिंडीच्या प्रस्थानावेळी मंदिराचा हलणारा कळस याविषयी सांगताना, मंदिराचा कळस तीन वेळेस जो हलतो तो कोणकोणत्या कारणांसाठी हलतो, हे उदाहरणासह नमूद केले. माउलींच्या दिंडीचे प्रस्थान झाल्यानंतर आळंदी गावची अवस्था कशी होते, हे त्यांनी सांगितले. पुढे त्यांनी संतांच्या विचाराची मशागत आपण कशी करावी? व का? करावी हे सांगताना दिंडीचा प्रवास, मुक्कामाची ठिकाणे, रिंगण सोहळा आदींबाबत माहिती दिली. दिंडीमध्ये सहभागी होणाऱ्या महाराष्ट्र आणि महाराष्ट्र बाहेरील दिंड्यांचीही माहिती दिली. यामध्ये सहभागी होणारी प्रत्येक दिंडी, त्यांची शिस्त सांगताना वारीमध्ये व्यावसायिकांचीही वारी कशा पद्धतीने होते, हे सांगितले. त्याचबरोबर प्रत्येकजण माउली कसा होतो हे सांगितले. प्रत्येक ठिकाणचे स्थानमाहात्मे, पांडुरंगाच्या मंदिराचे कळस दर्शन, त्याचे भाग्य, त्याचबरोबर स्नानाचे माहात्म्य आपल्या मार्गदर्शनातून सांगितले. दुसरे पुष्प : दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी डॉ. श्रीकांत नाडगौडा यांनी 'खसखसीचा मळा' या विषयावर गुंफले. यावेळी त्यांनी उपस्थित ज्येष्ठ नागरिकांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, आपण ज्येष्ठांनी कधीही वृद्ध समजू नये, हा सल्ला देताना पांडुरंगाचे माहात्म्य अधोरेखित केले. त्याचबरोबर गाडगेबाबांचे स्मरण करून त्यांच्या कार्याची माहिती दिली. ज्येष्ठांनी आपला वेळ कसा घालवावा आणि आपले जीवन आनंदी करावे यासाठी त्यांनी स्व जीवनातील विविध गमतीदार किस्से, प्रसंग सांगून वेळेचा सदुपयोग आनंदी जीवनासाठी कसा करावा हे विविध विनोदी प्रसंगांतून सांगितले.